**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५३ वा ● मंगळवार ०९ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 53 | Date : 09/07/2024 blow Tuesday, Page 4 Price 4


## देशभरात ‘मुसळधार’ पाऊसचा हाहाकार..



दैनिक यशसिध्दि न्यूज

नवी दिल्ली : मोसमी पावसाने सोमवारी मुंबईसह देशाच्या अनेक भागांमध्ये हाहाकार माजवला. आसाम राज्यातील पूरस्थिती कायम असून, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश या डोंगराळ राज्यांमध्ये तसेच राजस्थानच्या वाळवंटातही अतिवृष्टीने जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्राने आसामला सर्वतोपरी मदत करावी, असे आवाहन केले. आसाममधील पूरस्थिती कायम असून, पुरात आतापर्यंत ६० जणांना जीव गमवावा लागला आहे. आसामच्या शेजारील अरुणाचल प्रदेशमध्येही मुसळधार पावसामुळे भूस्खलन तसेच । पान २ वर

# ‘पीपल्स एज्युकेशन सोसायटी’मुळे सामाजिक-आर्थिकदृष्ट्या उपेक्षित पिढ्या शिक्षित, स्वावलंबी

### राज्यपालांच्या उपस्थितीत सोसायटीचा वर्धापन दिन साजरा

दैनिक यशसिध्दि न्यूज

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४५ मध्ये स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही देशातील एक अग्रणी शैक्षणिक संस्था असून गेल्या ८ दशकांमध्ये, सोसायटीने सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या अनेक पिढ्यांना शिक्षित व स्वावलंबी केले आहे. आज संस्था विविध अडचणींना तोंड देत आहे. या समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्र्वासन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे दिले. राज्यपाल श्री. बैस यांच्या मुख्य उपस्थितीत पीपल्स एजुकेशन सोसायटी शिक्षण संस्थेचा ७९ वा वर्धापन दिन सोमवार (दि. ८) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे झाला,




त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री व पीपल्स एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष रामदास आठवले, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात, सोसायटीचे विश्र्वस्त उज्वल निकम, ड. बी.के. बर्वे, सचिव डॉ. वामन आचार्य, सहसचिव डॉ. यू. एम. मस्के, कार्यकारी समिती अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे आदी उपस्थित होते.

ज्यांनी जोखीम पत्करली, महासागरांवर वर्चस्व निर्माण केले आणि उद्योजक आणि व्यवसाय करण्यासाठी देश आणि खंड पार केले, त्यांनी जगावर राज्य केले. अनेक शतकांपासून सागरी राष्ट्र असलेल्या भारताचे जगातील अनेक दूरवरच्या देशांशी व्यापारी संबंध होते. देशाला त्याचे गतवैभव परत मिळवून देण्यासाठी शिक्षण, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, कौशल्य शिक्षण आणि उद्यमशीलतेला प्राधान्य । पान २ वर

## शरद पवार गटाला देणग्या स्वीकारण्याची मुभा; केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दिलासा

दैनिक यशसिध्दि न्यूज

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसला (शरदचंद्र पवार पक्ष) केंद्रीय निवडणूक आयोगाने मोठा दिलासा दिला आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या अनुच्छेद २९-ब व २९-क अंतर्गत देणग्या स्वीकारण्याची मुभा निवडणूक आयोगाने सोमवारी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिली.




राज्यात पुढील तीन-चार महिन्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार असून पक्षाला देणगी स्वीकारण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय निवडणूक आयोगाची सोमवारी भेट घेतली. शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर देणग्यांचे धनादेश स्वीकारण्याची पक्षाची मागणी मान्य करण्यात आली.

राज्याचे विद्यामान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीत सामील होण्याचा निर्णय घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडली. त्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार यांचा पक्ष मूळ राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचा निकाल दिला होता. आयोगाने शरद । पान २ वर

### २३ जुलै रोजी सुनावणी

**राष्ट्रवादी काँग्रेससंदर्भातील प्रकरणांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. अजित पवार गटाच्या आमदारांना अपात्र करण्यासंदर्भात शरद पवार गटाने केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी पवार गटाचे म्हणणे ऐकून घेतले. यासंदर्भात २३ जुलै रोजी सरन्यायाधीशांसमोर सुनावणी होणार असल्याची माहिती शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी दिली.आम्हाला देणग्यांचे धनादेश घेण्यासाठी करसवलत मिळत नव्हती. आम्हाला देणग्या पारदर्शक पद्धतीनेच स्वीकारायच्या आहेत. इतर मोठ्या पक्षांना देणग्यांमध्ये करसलवत मिळते, तशी आमच्याही पक्षाला मिळावी अशी आम्ही मागणी केली होती.**

**– सुप्रिया सुळे, खासदार**

## राज्यातील १५ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

दैनिक यशसिध्दि न्यूज

मुंबई : राज्यातील अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक दर्जाच्या १५ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. गृहमंत्रालयाने सोमवारी या बदल्यांचे आदेश जारी केले. त्यात राज्य कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक अभिताभ गुप्ता यांची अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई) येथे बदली करण्यात आली आहे. याशिवाय अपर पोलीस महासंचालक (दळणवळण) सुनील रामानंद यांची अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय) पदावर बदली करण्यात आली आहे. तर प्रवीण साळुंखे यांची अपर महासंचालक (लोहमार्ग, मुंबई) या पदी बदली करण्यात आली.

वैधमापन शास्त्राचे नियंत्रक पदावर कार्यरत सुरेश मेखला यांची अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) या पदावर बदली करण्यात आली आहे. महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभागातील अपर महासंचालक दीपक पांडे यांची वरिष्ठ अधिकारी सुनील रामानंद यांच्या बदलीने रिक्त झालेल्या अपर महासंचालक (दळणवळण) या पदावर बदली करण्यात आली आहे.



पाच अपर महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांनसह १० महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेशही सोमवारी गृह विभागाकडून जारी करण्यात आले. त्यात सुहास वारके यांची विशेष महानिरीक्षक (महिला व बाल अत्याचार), नागपूरच्या पोलीस आयुक्त अश्र्वती दोरजे यांची । पान २ वर

## ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेने विश्वास ठेवून खासदार म्हणून निवडून दिले तुमची कामे करणे हेच माझे ध्येय : खा.प्रणिती शिंदे

दैनिक यशसिध्दि न्यूज

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून प्रणिती शिंदे ह्या प्रचंड बहुमताने निवडून आल्याबद्दल सोलापूर शहर मध्य व उत्तर विधानसभा मतदारसंघातील जनतेचे, महाविकास आघाडीचे नेते मंडळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड महालक्ष्मी मंदिर मागे असलेल्या कै. राजमल बोमड्याल मंगल कार्यालय येथे कृतज्ञता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सोलापूर शहर मध्य व उत्तर विधानसभा मतदारसंघातील जनतेने आणि सहकार्य केलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, महविकास आघाडीचे इतर घटक पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रचंड बहुमत देऊन विजयी केल्याबद्दल नवनिर्वाचित खासदार प्रणिती शिंदे, व माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, यांनी आभार व्यक्त केले.



यावेळी कृतज्ञता व्यक्त करताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, भारताच्या प्रत्येक नागरिकांसाठी जिथे कायदे बनविले जातात त्या लोकशाहीचे मंदिर असलेल्या सर्वोच्च सभागृहात केवळ तुमच्या आशीर्वादामुळे पोहोचले आहे. तो क्षण मी शब्दामध्ये व्यक्त करू शकत नाही. हा विजय माझ्या एकटीचा नाही काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, इंडिया आघाडीच्या सर्व घटक पक्षाच्या सहकार्यामुळे हा विजय झाला आहे. ही निवडणूक सोप्पी नव्हती. पूर्वीचे निवडणूक विचारसरणी, तत्वावर लढायचे पण या निवडणुकीत चारसो पार, पैश्याचा वापर, ईडी, सीबीआय, जातीधर्मात भांडणे लावण्याचा प्रयत्न केला. काही जणांनी मॅनेज होऊन वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न, यासारख्या अनेक गोष्टींचा वापर केला गेला पण जनतेने लोकशाहीत लोकांची । पान २ वर

## पंढरपूर तहसील कार्यालयाकडून रेशन कार्ड बाबत नागरिकांना आव्हान

दैनिक यशसिध्दि न्यूज

पंढरपूर/प्रतिनिधीः सध्या राज्यामध्ये मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे या दृष्टीने तहसील कार्यालय पंढरपूर (पुरवठा शाखेत) शिधापत्रिकेतील महत्व लग्न होऊन गेले किंवा राहण्यास परगावी गेले असतील असे नाव कमी अथवा मात्र समाविष्ट करायचे असल्यास सुरू आहे ज्या लाभार्थ्यांना शिधापत्रिकेमध्ये नाव कमी अथवा नाव समाविष्ट करावयाची आहे त्यांनी पुरवठा शाखा तहसील कार्यालय पंढरपूर पुरवठा शाखा शी संपर्क साधावा सदरचे कामकाज हे दैनंदिन चालू आहे सदर योजनेचे नावाखाली कार्यालयाची आवारात तसेच गावोगावी खाजगी एजंट मोठ्या प्रमाणात काळधारकांची आर्थिक लूट करण्याची शक्यता नाकारता येत नाही । पान २ वर


### नांवात बदल

“पासपोर्ट काढण्यासाठी मी माझे नांव नबुवत अवलिया हुसेनी पिरजादे वरुन **नुर जहाँ बेगम अवलिया हुसेनी पिरजादे** असे बदलत आहे“. (जेथे नबुवत अवलिया हुसेनी पिरजादे हे जुने नाव आहे आणि नुर जहाँ बेगम अवलिया हुसेनी पिरजादे हे नवीन नाव आहे)


## गुरुपौर्णिमानिमित्त उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यलय अक्कलकोट येथे महत्वाची बैठक

दैनिक यशसिध्दि न्यूज

अक्कलकोट/प्रतिनिधीः गुरुपौर्णिमा निमित्ताने श्री.विलास यामावार उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय कार्यालय अक्कलकोट येथे प्रशासकीय अधिकारी,मंदिर समिती आणि अन्नछत्र मंडळ ट्रस्ट यांची बैठक घेण्यात आली. गुरुपौर्णिमा निमित्त अक्कलकोट शहरात छोटे -मोठे वाहन मंदिर परिसराकडे येऊन गर्दी करणार नाहीत त्या अनुषंगाने नगरपालिका यांचेकडून अक्कलकोट शहरातील महत्वाच्या ठिकाणी मजबुत स्वरूपाचे बॅरेंगेटिंग करण्यात यावेत असे तसेच मंदिर परिसरातील महत्वाचे ठिकाणी झ- सिस्टीम (लाऊड स्पीकर) व्यवस्था करणेबाबत श्री विलास यामावार



यांनी सुचना केलेल्या आहेत, त्यावेळी संबंधित नगरपालिकाचे नगर रचनाकार शुभम माहुरे, शैलेश बिराजदार यांनी कमलाराजे चौक, फत्तेसिंह चौक, कारंजा चौक, मैंदर्गी नाका,भक्त निवास हत्ती तलाव, समाधी मठ या ठिकाणी लाकडी बॅरेंगेटिंग करण्यात येणार आहेत. असे सांगितले.

तसेच श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर,अन्नछत्र मंडळ, भक्तनिवास, मैंदर्गी नाका,या ठिकाणी वाहनांची गर्दी न होता भाविकांना दर्शन घेणे सुलभ होईल कोणताही त्रास होणार नाही या दृष्टीने मंदिर परिसरात चारचाकी वाहने येणार नाहीत ते बाह्य वळणाने(बायपासने) बाहेरच जातील याबाबत पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांना नियोजन करणे बाबत सांगण्यात आले आहे.छोट्या वाहनांची पार्किंग व्यवस्था कमलाराजे चौक हत्ती तलाव जवळ बासलेगाव रोड, श्री स्वामी समर्थ दवाखाना मैंदर्गी रोड , अन्नछत्र मंडळ याच ठिकाणी करण्यात आलेले आहे.. अन्नछत्र मंडळात असलेली पार्किंग व्यवस्था

मैंदर्गी रोडच्या बाहेर पडणाऱ्या गेट मधुनच प्रवेश करेल आणि तेथुनच बाहेर पडण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याबाबत अमोलराजे भोसले यांनी सहमती दर्शविली आहे. मंदिर समिती आणि अन्नछत्र मंडळ यांना, विलास यामावार यांनी मंदिरातील दर्शन रांग, भाविकांना रांगेत पिण्याची पाण्याची व्यवस्था,सध्या पावसाचे दिवस असल्याने बाहेरील दर्शन रांगेत मंडपची/पत्रे यांची व्यवस्था करण्यात यावी .त्यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे आणि अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील असे सांगितले.

कोठेही अनुचित प्रकार घडु न देता अतिशय चांगल्या पद्धतीने श्री गुरुपौर्णिमा चे नियोजन पोलीस प्रशासन, नगरपालिका आणि आम्ही स्वतः हजर राहुन भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही. असे तहसीलदार विनायक मगर यांनी सांगितले..

बैठकीला तहसीलदार विनायक मगर नगरपालिकाचे नगर रचनाकार शुभम माहुरे,शैलेश बिराजदार पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे ,श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले , कार्यालयाचे धनराज शिंदे, गोपनीय अंमलदार गजानन शिंदे, हजर होते...

## संपादकीय

### सरकारवर घणाघाती आरोप..

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सभागृहातील आपल्या भाषणादरम्यान महायुती सरकारवर घणाघाती आरोप केले. हे आरोप करताना वडेट्टीवार यांनी घातलेली आर्त साद सगळ्यांच्याच जिव्हारी लागली, ती म्हणजे मुंबईला 'अदानीं'पासून वाचवा. अदानी पूर्ण मुंबई साफ करीत असताना राज्याचे प्रमुख अदानींना पाठीशी घालत आहेत, असा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार यांनी विधानसभेत मुंबईतील जमिनी हस्तांतरणाचा मुद्दा उपस्थित केला, त्यावेळी ते बोलत होते. कुर्ला येथील दुग्धशाळेची सुमारे वीस हजार कोटी रुपये मूल्य असलेली साडेआठ हेक्टर जमीन आहे. ही जमीन १० जून २०२४ रोजी एकाच दिवशी पशुसंवर्धन विभाग व महसूल विभागाकडून अदानी यांना हस्तांतरित करण्यात आली. हे हस्तांतरण अवघ्या एकाच दिवसात झाले. इतकी तत्परता कशी, असा सवाल त्यांनी केला. या जमिनीच्या हस्तांतरणासंदर्भात तत्कालीन पशुसंवर्धन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी काय शिफारशी केल्या होत्या. मुंढे यांनी दिलेली नोट अनुकूल नसल्यानेच त्यांची बदली करण्यात आली का, असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. महायुती सरकारने सभागृहाला याबाबतची माहिती देण्याची मागणी त्यांनी केली. वडेट्टीवार यांनी केलेला आरोप अतिशय गंभीर आहे. सद्य:स्थितीत मुंबईत एखाद्या घराचा मालकी हक्क बदलायचा झाला तरी त्यासाठी कित्येक कागदपत्रे बनवावी लागतात. स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. तिथेही अधिकारी दाद देत नसल्याने दलालांना मध्यस्थी घालावे लागते. चिरीमिरीपासून चहापाणीपर्यंत सगळे खर्च करावे लागतात. तेव्हा कुठे काम होते. अशा वेळी अदानी हे महायुती सरकारचे जावई असल्याप्रमाणे राज्य सरकारच्या मालकीची म्हणजेच मुंबईकरांची जमीन त्यांच्या घशात घातली जात असेल, तीदेखील कवडीमोल दरात तर प्रश्न उपस्थित व्हायलाच पाहिजे. आज मुंबईतील उद्योगधंदे, शहराच्या आर्थिक नाड्या या आधीपासूनच परप्रांतीयांच्या हाती होत्या. परंतु, मराठी माणूस मुंबईतील जमिनी ताब्यात ठेवूनच आपले अस्तित्व राखून होता. याच जागा आता त्याच्या हातातून हिसकावून घेतल्या जात आहेत.

पान १ वरुन

### पंढरपूर तहसील कार्यालयाकडून रेशन

त्या अनुषंगाने पंढरपूर तालुक्यातील सर्व कार्डधारकांना आवाहन करण्यात येते की खाजगी एजंट यांच्या हमेशाला बळी न पडता तहसील कार्यालय पंढरपूर पुरवठा शाखा येथे विहित नमुन्यात अर्ज सादर करणे नाव कमी अथवा नाव समाविष्ट जलद गतीने केली जाईल सदर अंमलबजावणीसाठी कोणत्याही प्रकारची शासकीय फी आकारली जात नाही. सदरचे कामकाजही विनाश शुल्क केले जात असल्याने शेतकरी खातेदार काळधारक यांनी कोणत्याही एजंट कडे पैसे नाही देता थेट तहसील मध्ये संपर्क करावा असे आव्हान तहसीलदार सचिन लंगोटे यांनी केले आहे

### ग्रामीण आणि शहरी भागातील..

ताकद सर्वांपेक्षा जास्त असते हे दाखवून दिले. जनता जनार्दन आमच्यासाठी देव आहेत म्हणून निवडून दिलेल्या देवासमोर आज कृतज्ञता व्यक्त करते. आत्ता तुमच्या सर्वांची कामे करणे हेच माझे कर्तव्य आहे. तुमचे स्वप्न हे माझे स्वप्न आहेत. कामे केल्यामुळे शहरातील जनतेने मला तीनदा आमदार म्हणून निवडून दिले काम करणारे आहेत म्हणून ग्रामीण भागातील जनतेने आत्ता विश्र्वास दाखवून खासदार म्हणून निवडून दिले. येणाऱ्या तीन महिन्यांनी विधानसभा निवडणूक आहे. भाजप पुन्हा जातीधर्मात भांडणे लावण्याचा उद्योग करणार आहे. त्या गोष्टीला बळी पडू नका शेवटी नुकसान आपले होणार आहे. म्हणून काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनी जनतेत जाऊन जागृती करा. सोलापूर लोकसभेच्या सहाही विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे आमदार निवडून आणण्यासाठी तयारीला लागू या असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. या कार्यक्रमास ज्येष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, दिलीपराव माने, विश्र्वनाथ चाकोते, धर्मराज काडादी, ज्येष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री भाकप चे कॉ. नरसय्या आडम मास्तर, माजी महापौर महेश कोठे, जनार्दन कारमपुरी, जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार पवार, संजय हेमगड्डी, प्रवक्ते अशोक नींबर्गी, अलकाताई राठोड, सुशिला आबुटे, मनोहर सपाटे, आरिफ शेख, शिवसेनेचे अस्मिता गायकवाड, अजय दासरी, विष्णू कारमपुरी, प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकर, आम आदमी पार्टीचे निहाल किरनल्ली, समाजवादी पार्टीचे अबुतालीब डोंगरे, महेश गादेकर, सुरेश फलमारी, दत्ता सूरवसे, नाना काळे, भारत जाधव, महादेव कोगणूरे, सुनीता रोटे, सुदीप चाकोते, रियाज हुंडेकरी, मनोज यलगुलवार, विनोद भोसले, तौफिक हत्तूरे, शिबा बाटलीवाला, फिरदोस पटेल, वैष्णवी करगुळे, कुमुद अंकराम, नलिनीताई कलबुर्गी, नसीमा शेख, प्रमिला तूपलवंडे, गणेश डोंगरे, अंबादास करगुळे, वाहिद बिजापूरे, दत्तु बंदपट्टे, केदार उंबरजे, देवाभाऊ गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, उदयशंकर चाकोते, लक्ष्मीकांत साका, सुनील रसाळे, सुशील बंदपट्टे, उमेश मामड्याल, शौकत पठाण, किसन मेकाले, एजाज बागवान, भीमाशंकर टेकाळे, उमेश सुरते, नागनाथ कदम, युवराज जाधव यांच्यासह इतर मान्यवर पदाधिकारी हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

# बॅरिस्टरांनी घेतलेली ऐतिहासिक उडी

स्वा.विनायक दामोदर सावरकरांनी मार्सेल्स बंदरात ती जगप्रसिद्ध उडी घेतली होती. आज पण काही लोक म्हणतात की, सावरकर ५ मिनिटंही पोहोले नसतील आणि ती उडी गाजलेली नव्हे तर ती मुदामहून गाजवलेली होती इ. काहीजण तर या उडी मारण्याच्या पराक्रमासाठी सावरकरांना पळकुटे म्हणण्याइतकी हिंमत करतात!!!

वास्तविक पाहता सावरकर किती वेळ पोहोले, हे महत्वाचं नाहीच आहे. त्या पोहोण्याचे परिणाम काय झाले हे महत्वाचे!!! सावरकर तुरुंगात असताना एका चीनी बंद्याने सावरकरांना अतिशय भक्तिभावाने विचारले होते, 'महाराज आपण किती दिवस पोहत होता'? तर सावरकर शांतपणे उत्तरले होते, 'दिवस कसले, पाच मिनिटंही पोहलो नसेन'! हे स्वत: सावरकरांनीच लिहून ठेवलंय. त्याचवेळी त्या चीनी बंद्याचा कसा हिरमोड झाला हेही त्यांनी प्रांजळपणाने लिहिले!

आता आपण जरा त्या ठिकाणी काय घडलं होत हे पाहूयात. सावरकरांविरुद्ध अटक वॉरंट निघालं त्यावेळी सावरकर इंग्लंडमध्ये नव्हतेच. ते फ्रान्समध्ये होते. याचाच दूसरा अर्थ असा की, सावरकर जर इंग्लंडमध्ये परतलेच नसते, तर इंग्रज सरकार त्यांना बापजन्मीही पकडू शकले नसते. फ्रान्समधून बाहेर पडण्याच्या आणि भूमिगत राहून क्रांतिकार्य करण्याच्या हजारो वाटा होत्या. पण तरीही सावरकर परतले आहेत ते केवळ 'मी सापडत नाही म्हणून माझ्या अनुयायांना त्रास दिला जातोय. तो थांबवावा' यासाठी! यातून हेच स्पष्ट होते की, सावरकरांना जर फ्रान्सच्या एका बंदरात उडी मारून पळूनच जायचे असते, तर मुळात ते फ्रान्सहून इंग्लंडला अटक करवून घ्यायला आलेच नसते! दुसरे असे की, सावरकरांचे इंग्लिश अनुयायी श्री. गाय आल्ड्रेड हे सावरकरांना एकदा इंग्लंडच्या तुरुंगात भेटले आणि त्यांनी विचारले की, तुम्हाला इथून पळून जाण्याची काही व्यवस्था करू का? सावरकरांनी त्यांना स्वच्छ सांगितले की, मी माझी योजना तयार केली आहे. हे स्वत: आल्ड्रेड यांनीच आपल्या आत्मचरित्रात नोंदवले आहे. याचाच अर्थ असा की, सावरकरांच्या डोक्यात दुसरेच काहीतरी विचार चालू असला पाहिजे. आता ते काय, पुढे पाहू!

दि. ८ जुलै १९१० रोजी सावरकरांनी पहारेकऱ्यास शौचाला जायची परवानगी मागितली. तो त्यांना घेऊन गेला व शौचालयाबाहेरच थांबला. सावरकरांनी आत जाताच दार लावून घेतले. त्या दाराला असलेल्या पोर्ट होलवर वरती आपला कोट टांगला. ते त्या पहारेकऱ्याच्या लक्षात आले. पण बहुतेक लज्जेमुळे सावरकरांनी असे केले असावे, असा विचार करून तो गप्प बसला. त्या दाराच्या बरोब्बर समोर – थोडे वरच्या बाजूला – समुद्राकडे उघडणारे एक दुसरे पोर्ट होल होते. सावरकरांनी आदल्या दिवशीच ठरवल्याप्रमाणे आपल्या गळ्यातील जाणंव्याने योग्य ते माप त्यांनी घेऊन ठेवले होते. त्यांनी आपला चष्मा बाजूला काढून ठेवला. आणि सारे शरीर त्या उघड्या पोर्ट होल मधून खाली झोकून दिले. विचार करा – पलिकडे किती फूटांवर पाणी आहे, मुळात पाणी आहे की नाही याचीदेखील कल्पना नसताना सावरकरांनी उडी घेतलीये! यापाठी सावरकरांनी



दाखवलेल्या अतुलनीय धैर्याची नुसती कल्पनाच केलेली बरी!

जहाज ते पाणी यांत २७ फुट अंतर होते. इतक्या उंचावरून समुद्राच्या पाण्याचा फटका किती जोरात बसतो, याची कल्पना पट्टीचे पोहणारे करू शकतात! जहाज ते बंदराची भिंत यात सुमारे ८ फुट अंतर होते. सावरकरांची उंची सुमारे पाच-साडेपाच फुट. म्हणजेच उडी मारताना घाई-गडबडीत थोडी जरी वेडीवाकडी हालचाल झाली असती, तरीही कपाळमोक्ष ठरलेलाच! बरं पाण्यात पडल्यावर तरी सुटका झाली का? अजिबात नाही. क्षणाचीही उसंत न घेता सावरकर जहाजाला वळसा घालून बंदराच्या भिंतीच्या दिशेने पोहायला लागले. बंदराची भिंत सुमारे ९ फुट उंचीची होती. सतत पाण्याशी संपर्क येऊन ती किती निसरडी झाली असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता! शिवाय तिचा वापर माणसांच्या चढ-उतारासाठी कधीच केला जात नसल्याने तिला हात-पाय रोवायला किंचितही जागा नव्हती. सावरकर तश्याही परिस्थितीत वर चढले. एक-दोन नव्हे, तर तब्बल ९ फूट! आणि मग ते पळत सुटले. सावरकरांना घ्यायला मादाम कामा आणि श्री. व्हि. व्हि. एस. अय्यर येणार होते, हा कुणीतरी पसरवलेला ऐतिहासिक अपसमज आहे. वास्तविक असे कुणीही येणार नव्हते. एव्हाना पहारेकऱ्यांना सावरकर निसटल्याची कल्पना आलीच होती. ते सावरकरांच्या मागे लागले. सावरकरांनी तश्याच अवस्थेत एक फ्रेंच पोलिस गाठला. मात्र सावरकरांची अवस्था पाहून आणि त्यांचे बोलणे नीटसे न समजल्यामुळे तो सावरकरांची काहीच मदत करू शकला नाही. तोपर्यंत पोहोचलेल्या इंग्रजी पहारेकऱ्यांनी त्या फ्रेंच पोलिसास काहीतरी चिरीमिरी दिली, सावरकरांना आपल्या ताब्यात घेतले आणि पुन्हा जहाजाच्या दिशेने चालवले!

हे ते सावरकरांचे तथाकथित ५ मिनिटांचे पोहणे! उपरोक्त वर्णन वाचून सावरकरांनी किती जोखीम उचलली याची वाचकांना कल्पना आलीच असेल! हा कसला पराक्रम, ही तर फसलेली योजना – असंही काही मित्रांना वाटण्याचा संभव आहे! सावरकरांनी श्री. गाय आल्ड्रेडला सांगितलेली 'योजना' सुरू होते ती नेमकी इथेच!!

सावरकराची ही उडी पाहून लोककवी मनमोहन म्हणतात,

ही उडी बघतांना मृत्यू कर्तव्य विसरला ।
बुरुजावर झेपावलेला झाशीतील घोडा हसला ।।
वासुदेव बळवंतांच्या कंठात हर्ष गदगदला ।
क्रांतीच्या केतूवरला अस्मान कडाडून गेला ।।
विश्र्वात केवळ आहेत विख्यात बहाद्दूर दोन ।
जे गेले आईकरिता सागरास पालांडून ।
हनुमानानंतर आहे त्या विनायकाचा मान ।।
– लोककवी मनमोहन

सावरकरांना पळूनच जायचे असते तर ते कधी इंग्लंडला परतलेच नसते. भूमिगत राहून कार्य केले असते. मग सावरकरांनी इंग्लंडला येऊन, परत इंग्रजांच्या खर्चाने फ्रान्सला जाऊन आणि मग जाहीर उडी ठोकून काय मिळवले? याचे उत्तर दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांनी दिले! एखाद्या देशाचा गुन्हेगार जर दुसऱ्या देशाच्या भूमिवर असेल, तर त्याला पकडण्यासाठी त्या संबंधित देशांमध्ये 'गुन्हेगार हस्तांतरणाचा करार' असावा लागतो – असे आंतरराष्ट्रीय कायद्याचे तत्त्व आहे! तसा तो करार इंग्लंड आणि फ्रान्सदरम्यान होता. मात्र त्याची एक प्रक्रिया असते. ती न पाळताच सावरकरांना इंग्रज पहारेकऱ्यांनी ओढत नेले होते. थोडक्यात एक बेकायदेशीर गोष्ट घडली होती. दुसऱ्या दिवशीची सारी फ्रेंच वर्तमानपत्रे ही इंग्लंडच्या या बेकायदेशीर वागण्यावर टीकेची झोड उठवण्यात रंगून गेलेली होती! ज्या साम्राज्यावर कधीच सूर्य मावळते नाही त्या इंग्रजी साम्राज्याला आपल्या कूटनीतीच्या बळावर सावरकरांनी एक आंतरराष्ट्रीय पातळीवरील बेकायदेशीर गोष्ट करायला भाग पाडले होते. अवघ्या इंग्रज सरकारचा आपल्या योजनेत एखाद्या प्याद्यासारखा वापर करून घेतला होता! हळूहळू हे टीकेचे लोण जगभरात पसरले. फ्रान्सच नव्हे तर अवघा युरोप, अमेरिका खंड, पार जपान, रशिया आदी दूरचे देशही इंग्लंडवर जहरी टीका करू लागले व सावरकरांना सोडण्याची मागणी करू लागले. अवघे जग या एकाच विषयाने दुमदुमून गेले! मार्सेल्सच्या महापौरांनी इंग्रज सरकारला खरमरीत पत्र लिहून सावरकरांना सोडण्याची मागणी केली. वाद इतका वाढला की, सारे प्रकरण अखेर आंतरराष्ट्रीय न्यायालयात न्यावे लागले! कल्पना करा – आंतरराष्ट्रीय न्यायालय, जिथे दोन देश एकमेकांशी भांडतात. तिथे इंग्लंड आणि फ्रान्स हे दोन देश एकमेकांशी भांडताहेत. तेही कुणासाठी? तर एका तिसऱ्याच गुलाम देशातील विनायक दामोदर सावरकर नावाच्या माणसासाठी! एका रात्रीत 'भारत नावाचा काहीतरी देश आहे आणि तिथले नागरिक अन्यायी इंग्लंडपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी झगडताहेत' ही बाब जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली! कश्यामुळे? तर सावरकरांनी चाणक्यमतिने केलेल्या एका खेळीमुळे!! त्यानंतर लवकरच फ्रान्सच्या पंतप्रधानांना त्यागपत्र द्यावे लागले. भारताने, विशेषत: सावरकरांनी मिळवलेल्या या आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रसिद्धीचा फायदा भारतीय स्वातंत्र्यलढ्याला पुढे अनेकदा झाला.

आज या उडीला शंभर वर्षांहूनही अधिक काळ लोटलाय. मात्र त्यापाठी सावरकरांनी दाखवलेल्या आंतरराष्ट्रीय राजनीतीच्या सूक्ष्म आकलनाची खुमारी यत्किंचितही कमी झालेली नाही. प्रत्येक सच्च्या भारतीयास नेहमीच सावरकरांच्या ह्या उडीचा, अभिमान वाटत राहिल. आणि कोटी कोटी मस्तके स्वातंत्र्यवीरांपुढे नतमस्तक होत राहातील, होतच राहातील!!

वरील लेखातील काही संदर्भ हे धनंजय कीर लिखित वीर सावरकर चरित्रातून घेतले आहेत..

**प्रतिक चंद्रकांत दामा संपर्क – ९९७५६५४२०२**

### देशभरात 'मुसळधार'

पुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. उत्तराखंडमधील संततधार पावसामुळे कुमाऊं प्रदेशातील नद्यांना पूर आला आहे. हिमाचल प्रदेशात भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्गासह ७० हून अधिक रस्ते बंद करण्यात आले आहेत. राजस्थानच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस झाला. पुरामुळे काझिरंगा राष्ट्रीय उद्यानातील सुमारे १३१ वन्य प्राण्यांचा मृत्यू झाला. तर ९६ प्राण्यांची सुटका करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. मृत प्राण्यांमध्ये ६ गेंडे, ११७ हरीण, दोन सांबर, एक रीसस मॅकाक (वानर) आणि एका पाणमांजराचा समावेश आहे.

### शरद पवार गटाला देणग्या ..

पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार हे पक्षनाव व तुतारी घेतलेला माणूस हे निवडणूक चिन्ह बहाल केले होते. लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी हेच पक्षनाव व निवडणूक चिन्ह वापरण्याची परवानगी आयोगाने दिली होती.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार हे पक्षनाव बहाल केले असले तरी, पक्षाला देणगी स्वीकारण्याची परवानगी निवडणूक आयोगाने दिली नव्हती.

लोकसभा निवडणूक झाली असली तरी तीन-चार महिन्यांवर विधानसभेची निवडणूक असून देणग्या स्वीकारायच्या कशा अशा प्रश्र्न पक्षापुढे निर्माण झाला होता. आयोगाने पक्षनाव व चिन्ह बहाल केल्यामुळे देणग्या घेण्याचीही परवानगी असली पाहिजे

व इतर राजकीय पक्षांना देणग्या स्वीकारताना मिळणारी करसवलतही मिळाली पाहिजे अशी आग्रही मागणी पक्षाने केंद्रीय निवडणूक आयोगाला केली होती.

### राज्यातील १५ वरिष्ठ पोलीस

पोलीस महानिरीक्षक (नागरी हक्क संरक्षण) व विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र छेरिंग दोरजे यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) या पदी बदली करण्यात आली आहे. छेरिंग दोरजे यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या नागपूर परिक्षेत्राच्या विशेष महानिरीक्षक पदी डी.के. पाटील-भुजबळ यांची बदली करण्यात आली आहे. तसेच पुणे शहर सहपोलीस आयुक्त पदावर रंजनकुमार शर्मा यांची बदली करण्यात आली आहे.


भारतीय पोलीस सेवेतील १५ अधिकाऱ्यांसह राज्य पोलीस सेवेतील सहा अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यात दहशतवाद विरोधी पथक, पुणे पदी अनिल शेवाळे, सहाय्यक आयुक्त, पुणे या पदी धन्यवाद गोडसे, उपविभागीय अधिकारी परतूर येथे दादाहरी चौरे, उपविभागीय अधिकारी, पाटण विजय पाटील, पोलीस उपअधिक्षक( अनुसचीत जाती प्रमाणपत्र पडताळणी,पालघर) मनोहर पाटील व सहाय्यक पोलीस आयुक्त नाशिक शहर येथे सुधाकर चंद्रभान सुराडकर यांची बदली करण्यात आली.

### 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'मुळे..

द्यावे लागेल, असे राज्यपालांनी सांगितले.उपेक्षित, वंचितांच्या उन्नतीसाठी शिक्षण हे एकमात्र प्रभावी माध्यम आहे. केवळ शिक्षणाद्वारे पीडित भारतीय जनतेला त्यांच्या मानव म्हणून असलेल्या अधिकारांची जाणीव करून दिली जाऊ शकते, असे डॉ. आंबेडकरांचे ठाम मत होते, असे राज्यपालांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झालेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आज मुंबई, नवी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नांदेड, बंगळूर आणि बिहारमध्ये अनेक शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे चालविली जात असून एकूण दीड लाख विद्यार्थी विविध शैक्षणिक सुविधांचा लाभ घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत आज जगातील सर्वात तरुण राष्ट्र म्हणून उदयास आले आहे. जगातील अनेक देश, त्यांच्या कुशल मनुष्यबळाची पूर्तता करण्यासाठी भारताकडे पाहत आहेत. या दृष्टीने पीपल्स एज्युकेशन सोसायटीने उच्च शिक्षणाला कौशल्य शिक्षणाची जोड द्यावी तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता विषयाबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे असे राज्यपालांनी सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महिला सक्षमीकरणाचे खंदे पुरस्कर्ते होते. विद्यापीठे तसेच महाविद्यालयांच्या नियामक मंडळांवर तसेच इतर महत्त्वाच्या निर्णय घेणाऱ्या संस्थांवर महिलांचा समावेश करावा, असे आवाहन राज्यपालांनी केले. समाजातील विषमता संपावी या दृष्टीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एजुकेशन सोसायटीची रचना सर्वसमावेशक केली होती. आज पीपल्स एज्युकेशन सोसायटी अनेक समस्यांना तोंड देत आहे. या सोसायटीला राज्यपाल सहकार्य करतील, अशी अपेक्षा केंद्रीय मंत्री श्री. आठवले यांनी यावेळी व्यक्त केली.

महाराष्ट्रात उच्च शिक्षणाचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा चांगले आहे. परंतु, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील युवकांचे सकल नोंदणीतील प्रमाण कमी आहे. ही तफावत कमी करण्यासाठी पीपल्स एजुकेशन सोसायटीसारख्या संस्थांना सरकारने विशेष अनुदान देऊन मदत करणे आवश्यक आहे, असे प्रा.सुखदेव थोरात यांनी यावेळी सांगितले.डॉ. आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संस्थांपैकी सिद्धार्थ महाविद्यालय, मिलिंद महाविद्यालय, विद्यार्थी वसतिगृहे या संस्थांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करावी, अशी मागणी श्री. थोरात यांनी केली.यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान करण्यात आले.सिम्बायोसिस सोसायटीच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर संग्रहालयाच्या संचालक संजीवनी शांताराम मुजुमदार, सरकारी वकील उज्वल निकम, ड. बी.के. बर्वे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सुरेश गोसावी, चैत्यभूमी स्मारक समितीचे महासचिव नागसेन कांबळे, लोककलेचे अभ्यासक गणेश चंदनशिवे, 'यशदा'चे बबन जोगदंड, सिंघानिया शाळेच्या संचालक रेवती श्रीनिवासन आदींना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# प्लास्टिक पिशवी बंदी विरोधात स्वच्छता निरीक्षक यांची धडक मोहीम




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे :उल्हासनगर महानगरपालिका स्वच्छता निरीक्षक श्री विजय बहनवाल स्वच्छता निरीक्षक श्रीअंकुश सोनवणे स्वच्छता निरीक्षक श्रीभरत खरात स्वच्छता निरीक्षक श्रीदीपक उज्जैनवाल स्वच्छता निरीक्षक तथा सहायक नियंत्रक अधिकारी यांनी उल्हासनगर खेमानी भाजी मार्केट आवात चौक या ठिकाणी प्लास्टिक पिशवी बंदीची मोहीम राबवित असताना त्यांना भवन बार दुकानात प्लास्टिक पिशवी आढळल्याने भवन बार मालकावर पंचनामा करून त्यांच्याकडून दंडात्मक पाच हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आले . प्लास्टिक पिशवी बंदी मोहीम चालू असल्याने व्यापारी व दुकानदार यांच्या मध्ये चिंतेची वातावरण निर्माण झाले. व्यापारी व दुकानदारांना अधिकारी यांनी सूचना दिल्या आहेत जर आम्हाला प्लास्टिक पिशवी आढळल्यास यापुढे उल्हासनगर महानगरपालिका आपल्याविरुद्ध कडक कारवाई करेल

# सैनिक तोफखाना रेजिमेंट मधून सेवानिवृत्त मेजर प्रकाश घटकांबळे यांचा भव्य सत्कार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः ७ जुलै २०२४माजी सैनिक तोफखाना रेजिमेंट मधून सेवानिवृत्त झालेले प्रकाश शरणप्पा घटकांबळे मूळ राहणार हसापूर



तालुका अक्कलकोट यांचा सत्कार समारंभ पार पडला. प्रतिकूल परिस्थितीतून सैन्यात जाऊन तेथून येऊन पुन्हा नियुक्त जलसंपदा विभागात नोकरीस लागून सेवानिवृत्त झालेले त्यांच्या सामूहिक सत्कार यशसिद्धी आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फर असोशियन महाराष्ट्र राज्य आणि समता सैनिक दल सिद्धनाथ ब्रिगेड तथा भारतीय बौद्ध महासभा तर्फे सामूहिक सत्कार करण्यात आला. सत्कारप्रमुख पाहुणे म्हणून आदरणीय केरू जाधव सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक, समाज संघटक समता सैनिक दल. सोलापूर शहर जिल्हा शाखा मुख्य पाहुणे म्हणून आदरणीय कॅप्टन कमलाकर महादेव कांबळे (जिल्हा उपाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा.)

तसेच मा .तळभंडारे संभाजी ,अनिल जगझाप, चंद्रकांत कांबळे ,सुरेश खलसोंडे, राहुल साबळे , शंभूदेव सुरवसे, श्रीशैल शिवशरण, भाऊसाहेब वंजारे ,विष्णू वाघमारे, सुरेश गेजगे,प्रमोद जाधव, सुनील डांगे, बेलभंडारे साहेब ,मधुकर माने इत्यादी साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभेदार जयानंद कांबळे साहेब यांनी केले. व आभार प्रदर्शन माजी सैनिक मेजर शिवपुत्र घटकांबळे साहेब (उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य एस सिद्धी आ.मा सै. ब. असोशियन) यांनी केले. बहुसंख्येने महार रेजिमेंटचे माजी सैनिक तथा समता सैनिक दलांचे सदस्य उपस्थित होते.

# अविनाश मडिखांबे एक व्यक्ती नसून गरीबांचे शक्ती आहे : सैदप्पा झळकी




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी/प्रतिनिधीः अविनाश मडिखांबे हे एक व्यक्ती नसून गोर गरीबांचे मोठ्या शक्ती आहे. असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे. सैदप्पा झळकी हे अविनाश मडिखांबे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून दुधनीत त्यांना शुभेच्छा दिला आहे. येथील महाईसेवा केंद्राच्या वतिने मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जिलांनी नाकेदार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना मोफत सर्टिफिकेट वितरण करण्यात आली आहे.उपस्थित मान्यवरांच्या हस्तेही दिव्यांग व्यक्तींना दाखले वाटप दकरण्यात आली आहे. यापरसंगी आरपीआय सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी शहर अध्यक्ष श्री गोरखनाथ धोडमनी,मुस्लीम आघाडिचे, मैहिदीमियाँ जिडगे दुधनी मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जिलानी नाकेदार,हबुसाब बळुर्गी, आजम शेखजी, गुरू धोडमनी, तिप्पण्णा गोटे, नबीलाल जमादार, इतर मान्यवर उपस्थित होते.

## पंढरपूर शहर पोलिसांची मोठी कारवाई

# १६गुन्ह्यातील ३४ तोळे ४ ग्राम सोने हस्तगत २४ लाख १४ हजार रुपये किमतीचे निघाले सोनी जिल्हा पोलीस प्रमुख शिरीष सरदेशपांडे यांची माहिती

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःपंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील चोरी झालेल्या गुन्ह्यांचा तपास लावण्यात पोलिसांना यश मिळाले आहे त्यामधील एकूण दाखल झालेल्या १६ गुन्हे उघडकीस आले आहेत त्यामधून एकूण ३४ तोळे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले असल्याची माहिती जिल्हा पोलीस प्रमुख शिरीष सरदेशपांडे यांनी दिली आहे

या हस्तगत करण्यात आलेल्या सोन्याची एकूण २४ लाख १४ हजार रुपये किमतीचे होत आहेत पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत असले विठ्ठल मंदिरामध्ये दर्शनाकरिता एसटीने प्रवास करून येणाऱ्या भाविकांची गर्दी ही नवीन एसटी स्टँड मध्ये प्रत्येक वारी व आधुन मधून होत असते सदर एसटीमध्ये जागा पकडण्यासाठी एसटीमध्ये वर चढत असताना भाविक प्रवास यांची गळ्यातील सोन्याचे मूल्यवान दागिने चोरण्याची प्रकार होऊन त्याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते सदरचे ही चोरी करून एक तरी एसटी मध्ये सोडून दुसरीकडे जायचे अन्यथा एसटीमध्ये चढून त्याची दुसरे सहकारी यांच्याकडे सदरचे सोन्याचे दागिने सुपूर्द करीत असल्याने एसटी स्टँड वरील शिवपुराण कार्यक्रमात दरम्यान झालेले गर्दी मिरर वस्तीचे ठिकाण बंद घरावर बाळ ठेवून सदर




कार्यक्रमातील व घरातील सोन्याची दागिने घेऊन पळून जात होती

या तपास कामी पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची विशेष पथके नेमून पंढरपूर शहर व परिसरातील एसटी स्टॉप नवीन एसटी स्टँड एसटी थांबण्याची ठिकाणे पंढरपूर शहरातील रेकॉर्डवरील गुन्हेगार आले होते का याबाबत माहिती काढली असताना गोपनीय बातमीदाराकडून एक बातमी मिळाली की सदरचे आरोपी हे पंढरपूर शहर व इतर पोलीस ठाण्याकडील रेकॉर्डवरील आरोपी सखाराम उर्फ सिकंदर छगन वाघमारे राहणार नाळवडी नाका बीड शाहरुख हमीद पठाण राहणार बीड अर्जुन भीमराव बाबर राहणार पूरग्रस्त कॉलनी बीड रत्नाबाई शेंडगे तालुका इंदापूर ताई नाना ढोबळे राहणार कोपरफळे तालुका बार्शी सुजाता युवराज बाबर राहणार फरफाळे तालुका बार्शी नितीन धर्मा कीर्तन करावी राहणार कोरफळे तालुका बार्शी जिल्हा सोलापूर शंकर विठ्ठल झेंड राहणार पंढरपूर महानंदा रामा राठोड राहणार कानडी पिंपळगाव तालुका गेवराई जिल्हा बीड राजेंद्र मोहन काळे राहणार कामठी रोड मोहोळ तालुका मोहोळ सनी सखाराम उर्फ सिकंदर वाघमारे राहणार माळवंडी नाका बीड रतनबळी शेंडगे राहणार आश्रम शाळा रोड साठे नगर इंदापूर तालुका इंदापूर जिल्हा पुणे सोन्या उर्फ सोमनाथ उर्फ लाल्या ईश्र्वर घोटाले राहणार बेलगाव तालुका कर्जत जिल्हा सोलापूर असे असल्याचे होते नवीन एसटी स्टँड जवळ एसटी बस मध्ये चढत उतरत असताना तारीख धार्मिक कार्यक्रमाच्या दरम्यान होत असलेल्या गरजेचा फायदा घेऊन महिला व पुरुषांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरत असल्याचे विरळ वस्तीवरील बंद घरातील सोन्याचे दागिने चोरत असलेली माहिती मिळालेली दोन्ही प्रकटीकरण शाखेची अंमलदार यांनी सापळा असून सदर आरोपींची गाई बीड कोरफळे इंदापूर सांगोला या ठिकाणी जाऊन त्यांची राहणीमान त्यांच्यावर पाळत ठेवून सदर आरोपींना इकडील दाखल होण्याचे कामे ताब्यात घेतले असता पोलीस ठाण्यात आणून त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत आपणास आपले साथीदार असं एसटी स्टँड मंदिर परिषदेत तसेच गर्दी होणारे मत व शिवपुराण कार्यक्रमाच्या वेळी बंद घरातील सोन्याचे दागिने चोरी केल्याचे सांगितले

विविध ठिकाणी राहणारे आरोपी यांचा नवीन एसटी स्टँड तसेच पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीतील गोपनीय बातमीदाराचे मार्फतीने सदर संस्थेच्या वास्तव्यांची माहिती हस्तगत करून घेऊन गुन्ह्यांचा कौशल्यपूर्ण सखोल तपास केला असता आरोपींनी खालील गुन्हे केल्याची उघडकीस आणले आहेत सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक सिरीस सर देशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम कुमार यावलकर उपयोगी पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग अर्जुन भोसले वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेची सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश भुजबळ सहाय्यक पोलीस राजेश गोसावी सहाय्यक पोलीस नागनाथ कदम दीपक चंदेरी सुराण हेंबाडे शरद कदम सिनेमा गोडसे नितीन पोलीस कर सचिन हेंबाडे नवनाथ माने शहाजी मंडले समाधान माने बजरंग बिचुकले निलेश कांबळे तसेच सायबर शाखा सोलापूर ग्रामीणचे योगेश नरळे यांनी केले आहे

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त सोलापूरात 'वसंत महोत्सव' साजरा

## खुतबोद्दीन शेख आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापुरातील शिवस्मारक सभागृहात वसंत महोत्सव पार पडला. १जुलै आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या १११ व्या जयंती निमित्त राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने संपूर्ण राज्यात १ ते ३१ जुलै पर्यंत ठिकठिकाणी वसंत महोत्सव घेतला जात आहे. त्या अनुषंगाने सोलापूर शहरात देखील वसंत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून गोर बंजारा धर्मपीठ पोहरागड येथून धर्मगुरू जितेंद्र महाराज, प्रसिद्ध उद्योगपती किसनभाऊ राठोड उपस्थित होते. यावेळी हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक याच्या कार्याची प्रेरणा घेत दहावी / बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव , आदर्श शेतकरी सन्मान, आदर्श शिक्षक पुरस्कार असे विविध उपक्रम घेण्यात आले. एकूण वीस गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तर आदर्श शेतकरी म्हणून नायक लालू राठोड, बाळासाहेब रजपुत, विकास राठोड, महादेव रोकडे, नेहरू राठोड, किसन राठोड यांना सन्मानित करण्यात आले. ज्ञान दानाचे पवित्र कार्य करणारे आदर्श शिक्षक सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय केगाव . शाळेचे शिक्षक श्री खुतबोद्दीन शेख सर श्री. कैलास राठोड सर, तेरामैल आश्रम शाळेचे श्री सुभाष पवार सर, मोहोळ येथील जि.प.शाळेचे श्री पिंटू राठोड सर,विवेकानंद इन्स्टिटयूटचे श्री आकाश राठोड सर यांना आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले.राष्ट्रीय बंजारा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेला अतिशय सुंदर कार्यक्रम युवा प्रदेशाध्यक्ष श्रीमंतराजे चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडला.

या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून गोरबोली चळवळीचे संयोजक गोर प्रकाश राठोड, शिवाजी राठोड (हामुगड अथणी), महंत गोपाल महाराज विजयपूर, बंजारा नेते विजय राठोड मुळेगाव तांडा, भाजपा नेते राजाभाऊ आलूरे (बाळे),तांडा सुधार योजनेचे जिल्हाध्यक्ष संदीप राठोड, शिवाजीनगर तांड्याची नायकण मथुराबाई पाटील, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राठोड, नामराजे पवार, करण रजपुत, मोतीराम पवार,सचिन रजपुत आदिंसह समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

या महोत्सवानिमित्त बोलताना अनेक मान्यवरांनी नाईक साहेबांच्या कार्याला उजाळा देण्याचा काम केला. त्यांच्या कार्याचा गौरव करून वसंतराव नाईक साहेब हेच बंजारांचे आदर्श आहेत.

समाजाने नाईक साहेबांच्या कार्याची प्रेरणा घेऊन वाटचाल करावी असे प्रतिपादन किसनभाऊ राठोड यांनी केले.या कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन राष्ट्रीय बंजारा परिषदेचे प्रवक्ते गोर मिथुन राठोड यांनी केले.

# मुगळी येते कार्यकर्ते मेळावा व जन संवाद प्रथमेश म्हेत्रे यांच्या उपस्थित कार्यक्रम सपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी /प्रतिनिधीः अक्कलकोट तालुकातील मुगळी येथे प्रथमेश भैय्या म्हेत्रे यांचा गाव भेट दौरा आयोजित करण्यात आला होता, लोकसभा निवडणुकांत मुगळी गावाने केलेले सहकार्य व पुढील काळातील राजकीय वाटचालीचे नियोजन आणि गावातील समस्या जाणून घेण्यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला होता.दरम्यान दौऱ्याचे नियोजन मुगळी काँग्रेस पक्ष व युवक काँग्रेस कार्यकर्ते, ढड ग्रुप मुगळी व च.ख र्सीिि यांच्या तर्फे करण्यात आले.

गावकऱ्यांतर्फे प्रथमेश भैय्यांचे स्वागत करण्यात आले व सत्कार मुस्लिम समाज अध्यक्ष दाऊद इनामदार यांनी केले.

प्रारंबी स्वागत भाषण आणि कार्यक्रमाची सुरुवात युवा समाजसेवक मुस्तफा भाई यांनी केली त्या नंतर प्रथमेश भैय्या यांनी आपले मनोगत मांडत लोकांच्या समस्या ऐकल्या, नागरिकांच्या प्रश्नांची उत्स्फूर्तपणे आणि समाधानकारक उत्तरे दिली व सर्व नागरिकांना भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांचे तत्परतेने निराकरण करण्याबद्दल आस्वस्त केले.

मुगली ग्रामस्थांनी लोकसभा निवडणूक प्रतिष्ठेची करत, म्हेत्रेसाहेबांच्या प्रेमाखातर आणि प्रणिती ताईंच्या निष्ठेसाठी उत्स्फूर्तपणे आणि निस्वार्थीपणे केलेल्या मतदान आणि सहायोगाकरिता प्रथमेश म्हेत्रे यांनी काँग्रेस पक्ष व म्हेत्रे परिवारातर्फे नागरिकांचे आभार मानले.कार्यक्रमाची सूत्रसंचालन राजकुमार बिराजदार यांनी केली

कार्यक्रमात स्वागत भाषण व कार्यक्रमाची सुरुवात करताना मुस्तफा भाई इनामदार यांनी केले , यावेळी



उपस्थित भीमराव पाटील, मुस्लिम समाज अध्यक्ष दाऊद इनामदार, मेहबूब (इंजिनियर) इनामदार साहेब, मल्लप्पा पटेल जी, दिलीप माळी व इतर मान्यवर व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

## टी.सी हरवला आहे

नावः अनिशा भगवान सोनवणे, मु.पो.मोहा ता. कळंब,जि.धाराशिव यांचा ज्ञानराज विद्यालय उंदरी तालुका केज जिल्हा बीड या शाळेचा आठवी पासचा टी.सी कळंब ते धाराशिव प्रवासादरम्यान हरवला असून ज्यांना कोणाला मिळाला असेल तर खालील मोबाईल **नंबर वर संपर्क साधावा.**

**संपर्क : ८८३००६४८१४ ९१८२५४६७१५.**

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा. वर्धापन दिन आणि श्रीगुरुपौर्णिमा उत्सव धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमांची जय्यत तयारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः राज्यासह भारत देशातच नव्हे तर परदेशात श्रीक्षेत्र अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थांचा महाप्रसाद म्हणून श्री भक्तांतून ओळख असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा. वर्धापन दिन आणि श्रीगुरुपौर्णिमा उत्सव धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमांची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, दि.११ जुलै पासून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची संस्थापना, संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी ३७ वर्षापूर्वी सन १९८८ साली केली होती. वर्धापन दिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सव धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम सन २०२४ यंदाचे २५ वे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. दि. २१ जुलै पर्यंत धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली संपूर्ण कार्यक्रमाची आखणी व मांडणी करण्यात आलेली आहे. यामध्ये न्यासाच्या आवारात उभा करण्यात आलेल्या शामियाना मंडप, यात्री निवास व भुवन, महाप्रसादालय आदी ठिकाणी रंगीबेरंगी विद्युत रोषणाई करण्यात आलेली असून श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील पालखी मार्गावर कापडी भगवे पताका, विविध मार्गावर कमानी, धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे फलक लावण्याचे काम प्रगती पथावर आहे.



सदरच्या कार्यक्रमांना हजारो भाविकांची उपस्थिती असते, त्यामुळे विविध उपाय योजना न्यासाने हाती घेतलेले आहेत. या सर्व कार्यक्रमाकरिता न्यासाचे सेवेकरी, पदाधिकारी, कर्मचारी हे कार्यरत आहेत. सध्या आषाढी वारीमुळे वारकरी यांची रेलचेल पाहता महाप्रसादाकरिता चोख नियोजन करण्यात आलेले आहे. भक्तांची सोय, स्वच्छता, नम्रसेवा याला महत्त्व देऊन न्यास कार्यरत आहे.

दहा दिवसाच्या कार्यक्रमात संगीत, भक्तीगीते, गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार, भावगीते, धम्माल विनोदी कार्यक्रम, किर्तन, नृत्य, अभंगवाणी, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमास प्राधान्य, व गुरुपौर्णिमेच्या दिवशी श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, नामस्मरण, जप व श्री गरुपुजेचे आयोजना बरोबरच पालखी उत्सव आदी कार्यक्रम होणार आहेत. गुरुपौर्णिमा उत्सव तयारी पाहता अन्नछत्र मंडळात श्री स्वामी भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, या उत्सवाकरिता राज्यातील नव्हे तर सातासमुद्रापलिकडील स्वामीभक्त अन्नछत्र मंडळात दाखल होत असतात. या नयनरम्य सोहळयाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आली असून, न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी कार्यक्रम स्थळाची पाहणी केली. याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, बाळासाहेब पोळ, निखिल पाटील, पिंटू साठे, गोटू माने, योगेश कटारे, प्रवीण घाटगे, महांतेश स्वामी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# मुगळी येते कार्यकर्ते मेळावा व जन संवाद प्रथमेश म्हेत्रे यांच्या उपस्थित कार्यक्रम सपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुकातील मुगळी येथे प्रथमेश भैय्या म्हेत्रे यांचा गाव भेट दौरा आयोजित करण्यात आला होता, लोकसभा निवडणुकांत मुगळी गावाने केलेले सहकार्य व पुढील काळातील राजकीय वाटचालीचे नियोजन आणि गावातील समस्या जाणून घेण्यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला होता.दरम्यान दौऱ्याचे नियोजन मुगळी काँग्रेस पक्ष व युवक काँग्रेस कार्यकर्ते, ढड ग्रुप मुगळी व च.ख सीिीि यांच्या तर्फे करण्यात आले.गावकऱ्यांतर्फे प्रथमेश भैय्यांचे स्वागत करण्यात आले व सत्कार मुस्लिम समाज अध्यक्ष दाऊद इनामदार यांनी केले. प्रारंबी स्वागत भाषण आणि कार्यक्रमाची सुरुवात युवा समाजसेवक मुस्तफा भाई यांनी केली त्या नंतर प्रथमेश भैय्या यांनी आपले मनोगत मांडत लोकांच्या समस्या ऐकल्या, नागरिकांच्या प्रश्र्नांची उत्स्फूर्तपणे आणि समाधानकारक उत्तरे दिली व सर्व नागरिकांना भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांचे तत्परतेने निराकरण करण्याबद्दल आस्वस्त केले.मुगली ग्रामस्थांनी लोकसभा निवडणूक प्रतिष्ठेची करत, म्हेत्रेसाहेबांच्या प्रेमाखातर



आणि प्रणिती ताईंच्या निष्ठेसाठी उत्स्फूर्तपणे आणि निस्वार्थीपणे केलेल्या मतदान आणि सहायोगाकरिता प्रथमेश म्हेत्रे यांनी काँग्रेस पक्ष व म्हेत्रे परिवारातर्फे नागरिकांचे आभार मानले.

कार्यक्रमाची सूत्रसंचालन राजकुमार बिराजदार यांनी केलीकार्यक्रमात स्वागत भाषण व कार्यक्रमाची सुरुवात करताना मुस्तफा भाई इनामदार यांनी केले , यावेळी उपस्थित भीमराव पाटील, मुस्लिम समाज अध्यक्ष दाऊद इनामदार, मेहबूब (इंजिनियर) इनामदार साहेब, मल्लप्पा पटेल जी, दिलीप माळी व इतर मान्यवर व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

# एसटी ऐकणार प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना; प्रत्येक आगारात 'प्रवासी राजा दिन'

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात (डेपो) दर सोमवारी व शुक्रवारी प्रवासी राजा दिन आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी एसटीचे जिल्हा प्रमुख म्हणजे विभाग नियंत्रक एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घेतील. त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतील. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असे मत एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी व्यक्त केले आहे. ही अभिनव योजना १५ जुलै पासून सुरू होणार आहे. प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये यांनी आपल्या समस्या-तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या, त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून




याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे.

एसटीच्या विविध बसेस मधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी त्यांच्याशी सौजन्याने वागावे अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाते. यासंबंधित प्रवाशी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागतो.

या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक असते. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. अर्थात, प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या १५ जुलै पासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी सर्व प्रवासी बंधू - भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे असे आवाहन एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या एस.टी.पासचा प्रश्न सम्यक विद्यार्थी आंदोलनाने लगेच सोडवले



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी शहरामध्ये येतात आणि विद्यार्थी नेहमी एसटीने प्रवास करत असतात पण गेल्या १० दिवसापासून एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करून सुद्धा विद्यार्थ्यांना एसटीचा पास मिळत नाहीये त्यामुळे विद्यार्थ्यांवर आर्थिक ताण पडत आहे

अशी तक्रार विद्यार्थी प्रज्वल गायकवाड आणि अनेक विद्यार्थ्यांनी संघटने कडे केली त्यावेळी लगेच एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली त्यांच्यासोबत त्या विषयावर चर्चा केली त्यानंतर त्यांनी उद्या लगेच विद्यार्थ्यांना पास देऊ अस आश्र्वासन अधिकाऱ्यांनी दिले यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे, साहिल कांबळे, भीमराव गायकवाड, आदी सह विद्यार्थी उपस्थित होते

# भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे यांचा शहापूर दौरा

## तालुक्यातील रेल्वे प्रवासी संघटनेकडून समस्यांचा पाढा जाहीर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहापूर / प्रफुल्ल शेवाळे - भिवंडी लोकसभा खासदार सुरेश (बाळ्या मामा )म्हात्रे यांनी खासदार म्हणून निवडून आल्यानंतर प्रथमच शहापूर दौरा केला आहे.. यात प्रामुख्याने तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्ग वरील ट्रॅफिक समस्या,खूप अडचणीची झालीये यात अनेक वाहने तासंतास अडकून पडतात आणि लोकांना आपल्या इच्छित स्थळी पोहचणे साठी वेळ लागत असतो.. याबाबत खासदार म्हात्रे यांनी महामार्ग चे अधिकारी आणि ठढज च्या अधिकारी वर्गसोबत बोलून सदर वाहतूक समस्या सोडविण्यासाठी सर्वोतपरी सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत.. या मध्ये रस्ता डागडुजी, वासिंद पूल आणि आसनगाव रेल्वे पुलाची कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.त्यानंतर खासदारानी दोन दिवसा पूर्वी शहरात आलेल्या पूर परिस्थिती ची पाहणी केली,यामध्ये शहापूर तहसीलदार सौ. कोमल ठाकूर यांना शासनाकडून योग्य ती मदत मिळणे बाबत सूचना केल्या. तालुक्यातील अनेक नागरिकांनी खासदारांना, ग्रामपंचायत पदाधिकारी वर्गानी निवेदन सादर केली.यानंतर तालुक्यातील महत्वाचे रेल्वे स्थानक असलेले आसनगाव स्थानकात खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांनी भेट दिली. यामध्ये कल्याण कसारा रेल्वे पॅसेंजर असोसिएशन आणि कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेने रेल्वे समस्या आणि संबंधित प्रश्र्नांचा अक्षरशः पाढा वाचला. यात आसनगाव होम प्लॅटफॉर्म, आसनगाव पूर्व पश्र्चिम पूल,कल्याण कसारा तिसरी चौथी लाईन याबाबत चर्चा करण्यात








आली.. लांब पल्लयाच्या रेल्वे गाडयांना कसारा येथे थांबा मिळावा, आसनगाव, कसारा लोकल वाढवायला पाहिजे असे मूलभूत प्रश्र्न खासदार यांच्या समोर मांडले आहेत.याबद्दल रेल्वे अधिकारी यांनी काही समस्या या राज्य सरकार च्या परवानगी ने नक्कीच सुटतील असं म्हटलं आहे. यावर खासदार बाळ्या मामा यांनी राज्य सरकार कडून जी काही प्रलंबीत प्रकरणे आहेत त्याची तपशील वार माहिती सादर करा अशा सूचना रेल्वे अधिकारी वर्गाला दिल्या आहेत.

कल्याण कसारा रेल्वे संघटनेकडून अध्यक्ष शैलेश राऊत, सचिव उमेश विशे, रेल्वे प्रवासी महासंघ सरचिटणीस जितेंद्र विशे, महासंघ कार्याध्यक्ष धनगर सर,पत्रकार आणि सदस्य महेश तारमाळे,टिटवाळा स्थानक प्रतिनिधी प्रफुल्ल शेवाळे, अजय गावकर, कल्याण कसारा कर्जत संघटनेचे अध्यक्ष राजेश घनघाव, विभागीय अध्यक्ष विजय देशेकर, राहुल दोंदे, आकाश डोळस, आरती भोईर, युवराज पंडित, रेल्वे महासंघ चे नंद कुमार देशमुख, मा. आमदार पांडुरंग बरोरा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट )चे विद्या वेखंडे, मनोज विशे आणि पदाधिकारी, रिक्षा संघटनेचे पदाधिकारी आणि नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांच्या शहापूर दौऱ्या सोबत कल्याण कसारा रेल्वे मार्गावरील समस्या आणि उपाय योजना करणे साठी रेल्वे प्रवासी महासंघाचे सरचिटणीस श्री जितेंद्र विशे यांनी विशेष प्रयत्न करून खासदारांना आसनगाव स्थानकात भेट घडवून आणली.

# पुण्याची जिगरबाज जोडी आकाश आणि सुरज मोरे ठरले 'मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन'चे महाविजेते

## सुपरस्टार होण्याचं स्वप्न झालं साकार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

स्टार प्रवाहवरील 'मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन' कार्यक्रमाचा महाअंतिम सोहळा नुकताच जल्लोषात पार पडला. पलख-पूर्वा, आकाश-सुरज, सिद्धेश-रुचिता आणि अपेक्षा-प्रतिक्षा यांच्यामध्ये ही महाअंतिम लढत रंगली. अटीतटीच्या या लढतीत कोथरुड पुणे येथील आकाश आणि सुरज मोरे या जिगरबाज जोडीने बाजी मारत विजेतेपदावर मोहोर उमटवली. तर उपविजेते पदाचा मान सिद्धेश थोरात-रुचिता जामदार आणि अपेक्षा लोंढे-प्रतिक्षा लोंढे या दोन जोड्यांना विभागून देण्यात आला. तृतीय क्रमांक पटकावला पूर्वा साळेकर आणि पलक मोरे या जोडीने. महाअंतिम सोहळ्यातील विजेती जोडी आकाश आणि सुरज मोरे यांना पाच लाखांची रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देण्यात आलं. तर उपविजेता जोडीला दोन लाख आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या जोडीला १ लाख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आलं.




विजेतेपदाचा आनंद व्यक्त करताना आकाश आणि सुरज म्हणाले, 'आम्ही आजवर बऱ्याच स्पर्धांमध्ये भाग घेतला मात्र मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन या कार्यक्रमाने विजेतपदाचा आनंद मिळवून दिला. आम्हाला टॅलेण्ट सिद्ध करण्यासाठी हक्काचा मंच दिल्याबद्दल स्टार प्रवाह वाहिनीचे खूप खूप आभार. हा सारा प्रवास स्वप्नवत आहे. या क्षणाची खूप वाट पाहिली होती. महाअंतिम सोहळ्यात सामील होण्यासाठी आम्ही बरीच मेहनत घेतली होती. इतक्या दिवसांच्या मेहनतीचं फळ मिळाल्यामुळे खूप आनंद होत आहे. या मंचाने अंकुश चौधरी, फुलवा खामकर आणि वैभव घुगे गुरुच्या रुपात दिले. या गुरुंकडून खूप काही शिकायला मिळालं.'

आकाश आणि सुरज दोघेही सख्खे भाऊ. लहानपणापासूनच दोघांनाही नृत्याची आवड होती. घरची परिस्थिती अत्यंत हालाखिची होती. मात्र तरीही दोघांची नृत्याची आवड लक्षात घेऊन त्यांच्या आईने त्यांना नृत्याचं प्रशिक्षण देण्याचं ठरवलं. बरीच आव्हानं समोर होती. अनेक अडचणींचा सामना करत आकाश आणि सुरजने आपली नृत्याची आवड जोपासली. अनेक छोट्या मोठ्या स्पर्धांमधून भाग घेत घेत आकाश-सुरजला मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन कार्यक्रमाविषयी कळलं आणि त्यांनी ऑडिशनसाठी थेट मुंबई गाठली. ऑडिशन

ते विजेता हा त्यांचा प्रवास खरोखर थक्क करणारा आहे. आकाश आणि सुरजचं यश पाहून त्यांच्या आईचे डोळे पाणावले होते. हे घवघवीत यश आकाश आणि सुरजचा पुढील प्रवास अधिक तेजोमय करेल हे नक्की. आकाश आणि सुरज जरी या पर्वाची विजेती जोडी असली तरी या स्पर्धेतील सर्वच जोड्यांनी या पर्वात आपली चमकदार कामगिरी दाखवली आहे. या सर्व स्पर्धकांच्या पुढील वाटचालीसाठी स्टार प्रवाह परिवाराकडून खूप साऱ्या शुभेच्छा.